नियमित दिवाणी दावा क्र. ०६/२०१८
फारुक शहा व इतर वि. ग्रामपंचायत अंधारी
**CNR MHAU**08-000119-2018

## निशाणी क्र.५ खालील आदेश

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज मुळ दाव्याचा निकाल लागेपर्यंत प्रतिवादी यांचेविरुध्द तुर्तातूर्त मनाई हुकूम मिळणेकरीता केला आहे.

२. वादीचे अर्जातील कथने व त्यांचे विधीज्ञ यांचा युक्तिवाद थोडक्यात असा की, वादी यांनी मुळ दावा प्रतिवादींविरुध्द मनाई हुकूमाकरीता व आज्ञात्मक मनाई हुकूमाकरीता केलेला आहे. वादी हे मुस्लीम फकीर असुन त्यांची मौजे अंधारी ग्रामपंचायत हद्दीमध्ये गट नं. ५९५ मध्ये वंश परंपरागत मुस्लीम फकीर कब्रस्तान असुन त्याचे क्षेत्र १५ गुंठयाचे आहे. सदर कब्रस्तानची नोंद महसुल अभिलेखी फेरफारने झालेली आहे.

३. सदर कब्रस्तानास कोणत्याही स्वरुपाचे संरक्षक कुंपन नसल्याकारणाने जनावरे मुक्त संचार करीत असल्याने कबरीची बेअदबी होवुन पावित्र्यास बाधा निर्माण झाली आहे. कब्रस्तानच्या लगत उत्तरेकडुन गावठाण हद्दीतील रस्ता प्रतिवादींसह इतर लोकांनी अतिक्रमण करुन रस्त्यालगत गटारीवर बेकायदेशिर बांधकाम केल्याने सांडपाणी कब्रस्तानमध्ये आले आहे. प्रतिवादी यांनी सदर रस्त्यावर अतिक्रमण करुन स्वच्छतागृहाचे बांधकाम केले आहे व त्याचे घाण पाणी कब्रस्तानात सोडले आहे.

४. सदर कब्रस्तानमध्ये जनावरांचा मुक्त संचार होत असल्याने वादींसह मुस्लीम फकीर समाजाच्या लोकांनी लोकसहभागातून तारेचे कुंपन उभारलेले असुन नालीचे पाणी कुंपनातुन कब्रस्तानमध्ये येत असल्याने सदर कब्रस्तानात वॉल कंम्पाउंन्ड करण्याकामी

वादींनी प्रयत्न सुरु केले. प्रतिवादींनी तहसिलदार, सिल्लोड यांना खोटे तक्रारी अर्ज देवुन वादीच्या वंश परंपरागत कब्रस्तानात अडथळा, हस्तक्षेप निर्माण करण्याचा प्रयत्न केला. वादी यांनी रस्त्यावर कुंपन करुन रस्ता अडविला या आशयाचा खोटा आभास प्रतिवादी सरपंच यांनी निर्माण करुन दिशाभुल केली. वादी यांनी कब्रस्तानास वॉल कंम्पाउन्ड करण्याच्या हेतुने कार्यवाही सुरु केल्याने प्रतिवादी हे चिडुन जावुन वादीचे समाजाच्या कब्रस्तानात विविध प्रकारे अडथळा निर्माण करीत असुन बांधकामास अडथळा, हस्तक्षेप करीत आहेत तसेच बेकायदेशिररीत्या अतिक्रमण करुन रस्ता निर्माण करण्याच्या प्रयत्नात आहेत.

५. सन २०१५ मध्ये वादी यांनी प्रतिवादी ग्रामपंचायत यांना उत्तर बाजुच्या रस्त्यावरील व नालीवरील रस्ता मोकळा करुन दयावा अशी विनंती केली, परंतु प्रतिवादी यांनी वेळ निभावली. वादी यांनी तहसिलदार यांना कब्रस्तान जवळील रस्ता खुला करुन देण्याची विनंती केली असता प्रतिवादींनी गावक-यांची दिशाभुल करुन कब्रस्तानातून नव्याने रस्ता निर्माण करण्याचा बेकायदेशिर प्रयत्न सुरु केला. याउलट, वादींनी रस्ता बंद केला अशी दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. तहसिलदार, सिल्लोड यांनी प्रतिवादी यांना गट नं. ५९५ च्या हद्दी कायम करण्याबाबत सुचवले. प्रतिवादी हे मुस्लीम समाजाची कब्रस्तान हडप करु पाहत असुन त्यातुन नवा रस्ता निर्माण करण्याच्या प्रयत्नात आहेत.

६. दिनांक ०७.०१.२०१८ रोजी वादींनी वॉल कंम्पाउंडच्या बांधकामास ठेवलेले साहित्य प्रतिवादींनी इतरत्र फेकण्यास सुरुवात केली व नविन रस्ता निर्माण करण्याची धमकी दिली, म्हणुन वादींनी प्रतिवादी विरुध्द गट नं. ५९५ मधील कब्रस्तानामध्ये दफन विधीस कोणत्याही स्वरुपाचा अडथळा, हस्तक्षेप करु नये, कब्रीची विटंबना करु नये,

गटाराचे पाणी सोडु नये, रस्ता निर्माण करण्याचा प्रयत्न करु नये तसेच कब्रस्तानच्या बांधकामास अडथळा, हस्तक्षेप करु नये म्हणुन तुर्तातूर्त मनाई आदेशाची विनंती केली आहे.

७. प्रतिवादी क्र. ४ तर्फे निशाणी क्र. ११ ला अनीस अहेमद वकील यांनी त्यांचे वकीलपत्र दाखल केले असून निशाणी क्र. २५ म्हणण्यामध्ये प्रतिवादी क्र. ४ चे नाव नमूद नाही, म्हणून प्रतिवादी क्र. ४ करीता निशाणी क्र. १ ला योग्य तो आदेश पारीत करण्यात आला आहे. प्रतिवादी क्र. २,३,५ ते १०, १२ ते १४ यांनी निशाणी क्र. २५ ला त्यांचे म्हणणे दाखल केले असुन निशाणी क्र. ३२ ला प्रतिवादी क्र. ११ करीता वादींनी पुरसिस दाखल केली आहे. प्रतिवादी क्र. १ त्यास नोटीस लागुन देखील त्यांचेतर्फे कोणीही हजर न झाल्या कारणाने निशाणी क्र. १ ला योग्य तो आदेश पारीत केला आहे. निशाणी क्र. २५ वरील प्रतिवादींचे म्हणणे थोडक्यात असे की, वादींनी त्याच्या दाव्यामध्ये प्रतिवादींची काय भुमिका आहे व कोणता अडथळा केला, याबाबत कुठेही खुलासा केला नाही. ग्रामपंचायत अंधारी यांनी गट नं. ५९५ संदर्भात कायदेशिर कार्यवाही केली असुन तहसिलदार, सिल्लोड यांनी सदर गट नंबर मोजणी करण्यासंदर्भात भुमी अभिलेख कार्यालय, सिल्लोड यांना निर्देश दिले आहेत.

८. वादींनी खरी परिस्थिती लपवलेली आहे. फेरफार क्र. १७५९ हा १९९५ मध्ये मंजुर झालेला आहे. त्याअनुषंगाने जमिनीचा पंचनामा करण्यात आलेला होता, त्या पंचनाम्यात चर्तुःसिमा नमुद करण्यात आल्या होत्या. वादींनी चुकीच्या चर्तुःसिमा नमुद केल्या आहेत. प्रतिवादींनी वादीला कोणत्या प्रकारचा अडथळा केला हे कुठेही स्पष्ट केलेले नाही. सन २०१५ मध्ये फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १०७ प्रमाणे वादींना पावबंद करण्यात आले होते. तहसिलदार, सिल्लोड यांनी भुमि अभिलेख यांना विवादीत जमिनीची

मोजणी करण्या संदर्भात निर्देश दिले आहेत. दाव्यास नमुद कारण बनावट आहे. बांधकामास लागणारे साहित्य सदर ठिकाणी नाही. तसेच बांधकामास परवानगी देण्यात आलेली नाही. तसेच वादींनी बांधकामाबाबत मा. जिल्हाधिकारी यांची परवानगी घेतलेली नाही. त्यामुळे त्यांनी वादीचा अर्ज रद्द करण्याची विनंती केली आहे.

९. वादी यांनी निशाणी क्र. ४ च्या यादीसोबत गट नं. ५९५ चा ७/१२, फेरफार नं. २०८१, तहसीलदार यांचे दिनांक १२.०२.१९९६, ०५.०८.१९९८ चे तलाठी यांना दिलेले पत्र, दिनांक १४.१२.१९९५, १८.०६.१९९८ चे पंचनामे इत्यादी कागदपत्रांच्या सत्यप्रती दाखल केल्या आहेत. तसेच दिनांक ०५.१२.२०१७, ०८.०१.२०१६ चे ग्रामपंचायत अंधारी यांनी तहसीलदार यांना दिलेले पत्र, दिनांक ०२.१०.२०१७ चे प्रोसीडींग बुकचा उतारा, दिनांक २७.११.२०१७ चे तहसीलदार यांना पोलीस ठाणे सिल्लोड ग्रामीण यांनी लिहिलेले पत्र, दिनांक २८.११.२०१७ वादी यांना तहसीलदार यांनी काढलेली नोटीसची प्रत, तलाठी कार्यालय यांनी तहसीलदार यांना दिलेले दिनांक १४.१०.२०१५ रोजीचे पत्र व सोबत पंचनामा, दिनांक ०५.१२.२०१७ चे वादी यांनी तहसीलदार यांना लिहिलेले पत्र, दिनांक २७.१२.२०१७ चे तहसीलदार यांनी वादी फारुक यांना फेरफार क्र. १३११ बाबत दिलेले पत्र, दिनांक १५.१२.२०१७ रोजीच वादी फारुक यांना उप अधीक्षक भूमी अभिलेख, सिल्लोड यांनी दिलेले पत्र, दिनांक २९.१२.२०१७ रोजीचे वादी यांनी तहसीलदार यांना दिलेले पत्र इत्यादी कागदपत्रे दाखल केली आहेत.

१०. तसेच निशाणी क्र. १८ च्या यादीसोबत दिनांक ३०.०१.२०१८ रोजी वादी फारुक यांनी गट विकास अधिकारी, उप अधीक्षक भूमी अभिलेख, सिल्लोड, पोलीस स्टेशन सिल्लोड ग्रामीण, सरपंच अंधारी व तहसीलदार सिल्लोड यांना दिलेल्या पत्राच्या छायांकीत

प्रती, तसेच आर.पी.ए.डी. पोस्टाच्या छायांकीत प्रती, दिनांक ०२.०२.२०१८ रोजीचे फारुक शहा यांनी तहसीलदार, सिल्लोड यांना दिलेला खुलासा इत्यादी कागदपत्रे दाखल केली आहेत. वादी यांनी निशाणी क्र. २७ च्या यादीसोबत फोटो तसेच तलाठी यांनी तहसीलदार, सिल्लोड यांना लिहिलेले दिनांक ०९.०१.२०१६ चे पत्र, पंचनामा, टोच नकाशा, दिनांक १४.१०.२०१५ चे पत्र, दि. १३.१०.२०१५ चा पंचनामा व इतर कागदपत्रे दाखल केली आहेत. प्रतिवादी यांनी निशाणी क्र. २० च्या यादीसोबत भूमी अभिलेख यांचेकडील मोजणी बाबतचे ०१.०२.२०१८ चे पत्र तसेच फोटो दाखल केले आहेत.

११. अर्ज, त्यावरील म्हणणे यांचे अवलोकन केले व दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला असता तसेच अभिलेखावर उपलब्ध कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता खालील मुददे माझ्या विचारार्थ निर्माण होतात, त्यावरती खाली नमुद कारणाप्रमाणे निष्कर्ष नोंदवीत आहे.

| **अ. क्र.** | **मुददा** | **निष्कर्ष.** |
|---|---|---|
| १ | वादीस प्रथमदर्शनी केस (दावा) आहे काय ? | ... नाही. |
| २ | न्यायाचा समतोल कोणाच्या बाजुने आहे ? | ... प्रतिवादींच्या बाजुने |
| ३ | तुर्तातूर्त मनाई हुकूम न दिल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे काय ? | ... नाही. |
| ४ | काय आदेश ? | ... अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमीमांसा

### मुददा क्र. १ ते ३ करीता –

१२. अभिलेखावरील उपलब्ध पुरावा पाहता सदर मुद्यांवर पुनरावृत्ती टाळण्याच्या दृष्टीने एकत्रीत विवेचन करणे न्यायोचीत होणार आहे, म्हणून सदर मुद्दे एकत्रीत विचारात घेण्यात येत आहेत. वादी यांचे म्हणणे असे की, ते जातीने मुस्लीम फकीर आहेत. मौजे अंधारी ग्रामपंचायत हददीत गट नंबर ५९५ मध्ये गावठाण लगत वादींचे वंश परंपरागत मुस्लीम कब्रस्तान असुन त्याचे क्षेत्र १५ गुंठयांचे आहे. सदर १५ गुंठयांची चर्तुःसिमा पुर्वेस – जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पश्चिमेस – रस्ता त्या पलीकडे नदी, उत्तरेस – गावठाण व गाडी मार्ग, दक्षिणेस – गटातील उर्वरीत जमिन आहे. वादीचे म्हणणे असे की, सदर कब्रस्तानास कुंपन नसल्याकारणाने जनावरे कब्रस्तानमध्ये मुक्त संचार करीत असल्या कारणाने तसेच त्यामध्ये सांडपाणी येवुन डपके तयार झाल्या कारणाने त्यांनी सदर कब्रस्तानास वॉल कंम्पाउंन्डचे काम सुरु केले. त्याकरीता त्यांनी बांधकामाचे साहित्य आणुन ठेवले. प्रतिवादी यांनी सदर बांधकामाचे साहित्य दिनांक ०७/०१/२०१८ रोजी फेकुन दिले असे कथन केले आहे.

१३. अभिलेखावर उपलब्ध कागदोपत्री पुराव्याचे व वादी यांच्या अर्जातील कथनांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादी यांनी सदर कब्रस्तानास वॉल कंम्पाउंन्ड करण्याकरीता साहित्याची जमवाजमव केली, तसेच सदर साहित्य वादमिळकत कब्रस्तानमध्ये आणुन ठेवले असे दर्शवणारा कोणताही कागदोपत्री पुरावा आजरोजी अभिलेखावर उपलब्ध नाही. वादी यांना सदर वाद मिळकत कब्रस्तानास वॉल कंम्पाउंन्ड करण्याकरीता मा. जिल्हाधिकारी किंवा इतर सक्षम अधिका–याने परवानगी दिली किंवा कसे याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही.

१४. वादींचे म्हणणे असे की, प्रतिवादी यांनी उत्तर बाजुच्या असणा–या रस्त्यावर तसेच नालीवर अतिक्रमण करुन बांधकाम केलेले आहे. तसेच प्रतिवादी यांनी नालीवर बांधकाम केल्या कारणाने नाल्याचे पाणी वाद मिळकत कब्रस्तानमध्ये येत असल्याचे कथन केले आहे. वादी यांनी वाद मिळकतीच्या उत्तरेस असणा–या रस्त्याजवळ प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी यांच्या मिळकती आहेत असे दर्शवणारा कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. तसेच कोणत्या प्रतिवादीने कश्याप्रकारे व किती अतिक्रमण केले असे दाखवणारा कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. त्याचबरोबर प्रतिवादी यांनी वाद मिळकतीच्या उत्तरेस असणा–या रस्त्यावर तसेच नालीवर अतिक्रमण करुन बांधकाम केलेले आहे असे दर्शवणारा कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. प्रतिवादींचे म्हणणे असे की, वादी यांनी त्यांच्या अर्जामध्ये प्रतिवादी हे कश्या प्रकारे अडथळा निर्माण करीत आहेत याबाबत सविस्तर नमुद केलेले नाही.

१५. याउलट प्रतिवादी यांनी तहसीलदार, सिल्लोड यांना दिनांक ०५/१२/२०१७ रोजी वाद मिळकत कब्रस्तानच्या लगत असणारा रस्ता काही लोकांनी बंद केलेला आहे, त्यामुळे रस्ता वापरास अडचण येत असल्याची तक्रार दिली. त्यानुसार तहसिलदार, सिल्लोड यांनी वाद मिळकत ५९५ ची मोजणी उप भुमी अभिलेख, सिल्लोड यांनी करावी असे निर्देश दिले. सदर वाद मिळकतीच्या झालेल्या मोजणीबाबत अभिलेखावर कोणताही कागदोपत्री पुरावा वादी अथवा प्रतिवादी यांनी दाखल केलेला नाही.

१६. वादींचे म्हणणे असे की, प्रतिवादी हे वाद मिळकत कब्रस्तानमधुन रस्ता निर्माण करीत आहेत. प्रतिवादी हे वाद मिळकतीतुन रस्ता निर्माण करण्याचे तयारीत आहेत असे दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा वादी यांनी अभिलेखावर दाखल केलेला नाही.

याउलट वादमिळकत कब्रस्तानलगत रस्ता पुर्वीपासुन अस्तीत्वात होता असे कथन वादींनी केले आहे. वरील सर्व विवेचन लक्षात घेता वादी यांनी प्रथमदर्शनी त्यांची केस शाबीत केलेली नाही. तसेच आजरोजी सकृतदर्शनी न्यायाचा समतोल वादीचे बाजुने दिसून येत नाही. वादी यांना वाद मिळकत कब्रस्तानच्या वॉल कम्पाउंडचे बांधकाम करण्यास परवानगी देण्यात आली तसेच त्याकरीता साहित्याची जमवाजमव केली, त्याचबरोबर वादी यांनी वाद मिळकत कब्रस्तानच्या वॉल कंम्पाउंडचे बांधकाम करण्यास सुरुवात केली आहे, असे दर्शविणारा कोणाताही सकृतदर्शनी पुरावा वादींनी अभिलेखावर दाखल न केल्या कारणाने न्यायाचा समतोल वादींचे बाजूने आहे असे म्हणता येणार नाही. म्हणून समतोल प्रतिवादींचे बाजूने आहे असे म्हणणे योग्य होईल. वादींच्या बाजूने सकृतदर्शनी केस नसल्या कारणाने तसेच समतोल वादींच्या बाजूने नसल्या कारणाने तूर्तातूर्त मनाईहुकूम न दिल्यास वादींचे न भरुन येणारे नुकसान होईल असे म्हणता येणार नाही. म्हणून तुर्तातूर्त मनाईहुकूम वादींच्या बाजूने देणे न्यायोचीत होणार नाही. सबब, मुद्दा क्र. १ ते ३ करीता त्याप्रमाणे निष्कर्ष नोंदवून मुद्दा क्र. ४ करीता पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) वादीचा निशाणी क्र. ५ चा अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२) प्रस्तुत अर्जाचा खर्च वादी व प्रतिवादी यांनी ज्याचा त्याचा सोसावा.

स्वाक्षरीत/–

(पी. एल. पाटील)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
सिल्लोड.

दिनांक . १३.०४.२०१८

**<u>C E R T I F I C A T E</u>**

" I affirms that the contents of this P.D.F. file order are same word to word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | K. A. Choudhari |
| Court Name | : | Shri. P. L. Patil<br>2nd Jt. Civil Judge (J.D.)<br>Sillod. |
| Date | : | 13.04.2018 |
| Order signed by presiding officer on | : | 13.04.2018 |
| Order uploaded on | : | 17.04.2018. |